


बहाई समाजात करतात बहाई वांङःमयाचे भाषान्तर जगातील ७५० हून अधिक भाषामध्ये झालेले आहे आपले आध्यात्मिक सत्य आणि दैवी प्रेरणेने चाललेल्या कार्यव्यवस्थेचे परिणामात्मक स्वरूप त्याच्या हया सामर्थ्यातून आणि शक्तिद्वारे प्रतिबिंबित होते

**बहाई तत्वप्रणाली**

हया युगासाठी बहाउल्लाह यांनी जी तत्वप्रणाली दिली त्यातील कांही पुढीलप्रमाणे आहेत.

१. **मानवजातीचे ऐक्यः** मानवजातीची एकता ही बहाई तत्वप्रणालीचा गाभा आहे. जागतिक एकता ही मानवजातीच्या परिपक्वतेमधील तत्क्रान्तीची शेवटची स्थिती असून प्रत्येक व्यक्तिने मानवजातीची एकता दैनंदिन जीवनातील प्रमुख आध्यात्मिक तत्व म्हणून मान्य केल्यानंतर ती प्रस्थापित होईल

२. **स्वतंत्र बुद्धीने सत्याचे संशोधन करणेः** मानवी इतिहासात प्रथमच स्वतंत्रपणे सत्याचे सशोधन करणे प्रत्यक्षात आज शक्य झाले आहे. खऱ्या अर्थाने स्वतत्रपणे सत्य संशोधन करण्यासाठी आज अशा लोकांची गरज आहे जे कुणीही दिलेल्या धर्मप्रणालीचा अंधविश्वासंने स्विकार करणार नाहीत.

३. **सर्व धर्माचा पाया एकच आहेः** बहाई मित्रांचा असा विश्वास आहे, की जगातील सर्वमहान धर्म दैवी प्रेरणेतून सस्थापित झाले आहेत. ते सर्वतत्कालीन गरजा आणि लोकांच्या क्षमता यानुरूप वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या ठिकाणी परमेश्वराद्वारेच प्रकट झाले आहेत.

४. **विज्ञान आणि धर्म यांतील आवश्यक सुसंगताः** बहाउल्लाह धर्म आणि विज्ञान एकमेकाशी सुसंगत असण्याबद्दल सांगतात. खरा धर्म तथा खरे विज्ञान कधीच एकमेकांच्या विरोधात नसतात. ते दोन्हीही एकाच सत्याचे एकमेकांना पुरक असे पैलू आहेत.

५. **स्त्री आणि पुरुष यांमधील समानताः** प्रकटित धर्माच्या इतिहासात प्रथमच बहाउल्लाह यानी स्त्री आणि पुरुष यांच्या समानतेची घोषणा केली ही घोषणा म्हणजे एक आदर्श तत्व आणि पवित्र आशा म्हणून त्यानी ती सोडून दिली नाही तर आपल्या समाजरचनेच्या चौकटीन मूल तत्व म्हणून त्यास दर्जा दिला त्यांनी दिलेल्या कायदयांमध्ये ह्या तत्वाचा त्यांनी पुरस्कार केला आणि शिक्षणाची समान सधी, त्याच प्रमाणे समाजात स्त्री पुरुषांना समान अधिकार यांचा त्यात समावेश केला

६. **सर्वप्रकारच्या दूषित पुर्वग्रहावर त्याग करणेः** दूषित पूर्वग्रहांवर खराखुरा उपाय म्हणजे मानवजातीच्या मुलभूत ऐक्याची सदैव जाणीव ठेवणे .मानवजातीच्या ऐक्याबद्दल आध्यात्मिक जाणीव एकदा का व्यक्तीला झाली मग ती आपले वैयक्तिक दूषित पूर्वाग्रह स्वेच्छेने सोडून देईल

७. **सार्वत्रिक सक्तिचे शिक्षणः** "शिक्षण" ही परमेश्वराने मानवाला दिलेली अमुल्य भेट आहे आणि जे स्वतः ला ह्या ज्ञान संपादण्याच्या संधीपासून वंचित ठेवतात, ते खरोखरच इतरांपेक्षा अत्यंत मर्यादित तथा संकुचित जीवन जगतात.

८. **विश्वशांतिः** मानवजातीचे ऐक्य वृद्धीगत करणे आणि विश्वशांती प्रस्थापित करणे हाच तर बहाई धर्माच्या तत्वप्रणालींचा मुलंभुत पाया आहे.

**इतर कांही बहाई तत्वें अशी आहेत.**

१ एका विश्वव्यापी सहाय्यक भाषेचा स्विकार करणे.
२. अति श्रीमंत तथा अति दारिद्रय यांचे निर्मुलन करणे.
३. राष्ट्रांराष्ट्रांमधील भांडण-तंटे हे जागतिक स्थरावरील एका न्यायालयाच्या स्थापनेद्वारे मिटविणे.
४ जीवन व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी आवश्यक अशा "न्यायपालनाचे" महत्व प्रतिपादणे.
५. सेवाभावी वृत्तीने केलेल्या कार्यास उपासने एवढाच दर्जा मानणे.
६. सर्व राष्ट्रें आणि त्यांतील लोकांचे संरक्षण फक्त धर्मपालनानेच होउ शकते हया भावनेचा पुरस्कार करणे.
७. आर्थिक प्रश्न आध्यात्मिक प्रातळीवर सोडविणे
८. आपल्या देशातील सरकारच्या आज्ञांचे पालन करणे.

**"एखादी व्यक्ती आपल्या देशावर प्रेम करते यामध्ये त्यास गर्व वाळगण्याचे कारण नाही, तर जो संपूर्ण जगावर प्रेम करतोत्यावर आहे. संपूर्ण पृथ्वी हा एक देश असून, मानव जात त्याचे नागरिक आहेत.**

**—बहाउल्लाह**

हया संक्षिप्त माहिती बरोबरच आम्ही आपणास बहाई धर्माविषयी स्वतः संशोधन करण्याचे आमंत्रण देत आहोंत आणि त्याचबरोबर यापैकी कोणत्या कार्यक्रमांमध्ये आपण आम्हास सहकार्य करू शकता यावर विचार करण्याची विनंती करित आहोंत.

अधिक माहितीसाठी विभागातील बहाई मित्रांशी संपर्क साधा किंवा पुढील पत्तयावर लिहाः



The Bahá'í Faith
www.bahai.org/national • 1-800-22UNITE
The Bahá'í House of Worship
100 Linden Ave., Wilmette, IL 60091
how@usbnc.org • www.bahaitemple.org
(847) 853-2300


**Marathi**


**बहाई उपासना मंदिर**
बहापूर, कालकाजी,
नवी दिल्ली-११००१९, फोनः ६४४४०३५


# बहाई धर्म

## संक्षिप्त परिचय



*Bahá'í House of Worship, Wilmette, U.S.A.*

**बहाई धर्म**

बहाई धर्म हा स्वतंत्र विश्वधर्म आहे. उत्पत्तिमध्ये दिव्य, आपल्या विस्तारामध्ये सर्वांना समाविष्ठ करणारा, आपल्या दृष्टीकोनामध्ये व्यापक, आपल्या आचारसंहितेमध्ये शास्त्रीय, आपल्या तत्वप्रणालींमध्ये मानवतावादी आणि मानवमात्रांच्या ह्रदयांवर प्रभाव करण्यासाठी गतीशील आहे तो परमेश्वराच्या एकतेचे समर्थन करतो, त्याच्या अवतारांच्या एकतेचा स्वीकार करतो आणि संपूर्ण मानवजातीची एकता आणि अखंडता या सिध्दान्तांची जोपासना करतो


**बहाई धर्माचा संक्षिप्त इतिहास**

प्रत्येक युगामध्ये ईश्वराचे निर्माणकारी शब्द आपल्या अवताराच्या अथवा संदेश वाहकाच्या माध्यमातून मानवजातीला कृपाप्रसाद म्हणून प्राप्त झाले आहेत. बहाई धर्मातील तीन केंद्रिय विभूती आहेत-बाब (१८१९-१८५०) बहाउल्लाह (१८१७-१८९२) आणि अब्दुलबहा(१८४४-१९२१)

**बाबः**

२३ मे १८४४ रोजी पर्शिया (इराण) येथील तेजस्वी तरुण बाब (प्रवेशद्वार) या नावांने ओळखला गेला, त्याने घोषणा केली कि ते स्वत एका आध्यात्मिक विभूतिच्या आगमनाची घोषणा करणारे तथा तीचा

मार्ग प्रशस्त करणारे अग्रदूत आहेत. त्यांची शिकवण उच्च स्वरूपाची होती आणि त्या व्यापक प्रमाणात लोकांकडून स्विकारली गेली. परतु धर्मांधं रूढीवादी संप्रदायाने त्यास अधार्मिक घोषित केले. बाब याचा छळ करण्यात आला



व शेवटी सन १८५० मध्ये त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यानंतरच्या दोन दशकांमध्ये बाब यांच्या जवळजवळ २०,००० हून अधिक अनुयायांना अमानुषरित्या ठार करण्यात आले.

**बहाउल्लाह**

बहाउल्लाह (ज्याचा अर्थ आहे परमेशवराचा प्रकाश) यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८१७ साली एका प्रतिष्ठीत कुटुंबात झाला. बाल्यावस्थेपासूनच आपल्या अनन्य साधारण बुध्दीच्या, ज्ञानाच्या तथा प्रतिभेच्या प्रभावाने ते आगळे ठरले. बाब यांच्या धर्मकार्याचे त्यांनी समर्थन केले म्हणून त्यांचा छळ झाला तसेच त्यांना तुरुंगवास भोगावा लागला १८५३ साली जेंव्हा ते तुरुंगात होते, त्यांना आपणच बाब यांनी ज्यांच्या आगमनाची घोषणा केली होती तो सर्वधर्मग्रंथातील वचनांची पूर्ती करणारा इश्वरीय अवतार असल्याचा साक्षात्कार झाला. सन १८६३ मध्ये जेव्हा बगदाद मध्ये ते हद्दपारी भोगत होते, बहाउल्लाह यांनी



जाहिरपणे आपणच वचनपूर्ती करणारा तो प्रतिक्षित ईश्वरीय अवतार असल्याची घोषणा केली. धर्माधिकाऱ्यांकडून त्याचा सततपणे छळ करण्यात आला आणि शेवटी त्यांना बगदाद येथून प्रथम कॉन्स्टॅन्टीनोपल मग ऐड्रियानोपल आणि शेवटी "अक्का" पॅलेस्टीन (१८६८) येथे हद्दपार केले. बहाउल्लाह यांचे स्वर्गारोहण १८९२ साली झाले व त्यांचा मृतदेह कार्मेलच्या डोंगराकडे सन्मुख असा, बहूजी येथे समाधिस्थ करण्यात आला

आपल्या जीवनकाळात बहाउल्लाह यांनी आपले धर्मकार्य पर्शिया आणि ऑटोमन साम्राज्य शाही पलीकडील तुर्कस्तान, भारत, ब्रह्मदेश, इजिप्त आणि सुदान या देशात पसरविले त्यांच्या ४० वर्षांच्या तुरुगवासाच्या जीवनात, बहाउल्लाह यानी दिव्य प्रेरणेद्वारे हजारों दैवी लेख प्रकट केले. जे सर्व आणि त्याचबरोबर बाब आणि अब्दुलबहा याचे दैवी लेखन मिळून "बहाई धर्माचे विस्तृत ग्रंथ" म्हणून प्रतिनिधित्व करतात हे धमग्रथ अपूर्व असे आहेत कारण एका महत्वपूर्ण धर्माचे 'देव्यज्ञान एकतर त्या धर्म संस्थापकाच्या स्वतःच्या हस्ताक्षरात उपलब्ध आहे किवा ज्ञानाच्या हस्तलिखित प्रतिवर (सचिवाने लिहिलेल्या) धर्मसस्थापकाची सही असल्यामुळे त्याची अधिकृतता संशयातित आहे

**अब्दुलबहा**

बहाउल्लाह यांनी आपल्या मृत्यूपत्राद्वारे आपला ज्येष्ठ पुत्र अब्दुलबहा (परमेश्वराचा सेवक) यांस बहाई समाजाचे नेतृत्व सोपविले तसेच आपल्या तत्वप्रणालींचा एकमेव भाष्यकार म्हणून नेमले. बहाउल्लाह यांच्या संपूर्ण हद्दपारीच्या काळात अब्दुलबहा त्यांच्या सहवासात वयाच्या नवव्या वर्षापासून (१८५३) होते. त्यांच्या कारकिर्दित बहाई धर्माचा प्रसार अमेरिका, कॅनडा, ब्रिटन आणि युरोप येथे झाला. २८ नोव्हेंबर १९२१ रोजी हैफा येथे त्यांचे महानिर्वाण झाले. आणि त्यांचा मृतदेह बाब यांच्याच समाधीच्या वास्तुमध्ये बाजूच्या खोलीत समाधिस्त करण्यात आला.

आपल्या मृत्यूपत्राद्वारे अब्दुलबहा यांनी आपला नातू शोघी एफेंदी यांना धर्म संरक्षक म्हणून नियुक्त केले आणि अशा प्रकारे हया धर्ममध्ये वेगवेगळे पंथ पडण्यापासून त्याचे रक्षण केले आणि अनुयायांची एकता सुनिश्चित केली.

**शोघी एफेंदी**

शोघी एफेंदीच्या मार्गदर्शनाखाली बहाई कार्यव्यवस्थेची स्थापना करण्यात आली आणि बहाई धर्म संपूर्ण जगात पसरला. त्यांच्या लेखनाने बहाई धर्मकार्याच्या क्षितीजाचा विस्तार झाला. या कार्यासाठी ३६ वर्षे, शोघी एफेन्दी यांनी अतोनात परिश्रम घेतले व शेवटी नोव्हेंबर १९५७ साली त्यांचा स्वर्गवास झाला. अशा प्रकारें परमेश्वराचा हा प्रकटित धर्म ११३ वर्षे (१८४४ ते १९५७) निरंतर मार्गदर्शनाखाली वाढला तसेच संरक्षित राहिला, आणि असे मात्र यापूर्वीच्या धर्मचक्रांत कधीच आढळले नाही.

**बहाई कार्यव्यवस्था**

बहाई समाजाची कार्यव्यवस्था बहाउल्लाह यांनी जी सर्वसाधारण तत्वप्रणाली दिली आहे, त्यानुरूप आणि त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाद्वारे चालविली जाते. हया संस्था आंतर्राष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर निवडून आलेल्या मंडळांकडून कार्यरत होतात. निवडणूकीच्या पद्धतीत कोणत्याही प्रकारचे पक्ष तथा दलें नसतात, ना उमेदवारी असते ना प्रचार असतो. बहाई कार्य व्यवस्थेच्या प्रत्येक पातळीवर, निर्णय घेण्याचे कार्य बहाई विचार विनिमयाच्या पद्धतीनुरूप चालते, ज्यामध्ये निवडून आलेल्या संस्थेच्या प्रत्येक सदस्यास आपल्या मतप्रदर्शनाच्या वेळी समान अधिकार व सारखीच जवाबदारी पेलावी लागते.

**आंतर्राष्ट्रीयः विश्वन्याय मंदिर**




ही नउ सदस्य असलेली कार्यव्यवस्थेतील उच्चतम सस्था, जी जगातील सर्व बहाई राष्ट्रीय आध्यात्मिक ससदांच्या सदस्यांद्वारे दर पाच वर्षांनी निवडली जाते, हैफा येथील आपल्या कार्यालयातून ती काम पहाते, जे ह धर्मकार्याचे आंतर्राष्ट्रीय स्तरावरचे केंद्र आहे.

बहाई धर्मातील प्रमुख तीन विभूतींच्या समाधी इथे असल्यामुळे आ बहाउल्लाह यांचा तसा आदेश असल्यामुळे हया विश्वव्यापी संस्थे कार्यालय या बहाई धर्माचे आध्यात्मिक केंद्र असलेल्या पवित्र भूमिम संस्थापित केले आहे. विश्वन्याय मंदिर बहाई धर्मकार्याच्या प्रगत संचालन करते आणि त्याच बरोबर उत्क्रान्तीच्या पथावर असलेल विश्व समाजाला बहाउल्लाह यांच्या तत्वप्रणाली नुसार विक करण्यामध्ये मदत करते.

**राष्ट्रीय : राष्ट्रीय आध्यात्मिक संसद**

निवडून आलेल्या नउ सदस्यांची ही संसद राष्ट्रीय पातळीवर ब धर्मकार्याची धुरा सांभाळते. प्रत्येक वर्षी बहाई मित्र आपला प्रतिनि निवडतात. जो राष्ट्रीय अधिवेशनामध्ये त्यांच्यातर्फे राष्ट्रीय आध्यात्मि संसदेचे नउ सदस्य निवडण्याच्या कार्यात भाग घेतो. राष्ट्रीय आध्यात्मि संसद, संपूर्ण देशातील बहाई कार्यक्रम तथा योजनांना प्रोत्सा देते, त्यांच्यात समन्वय साधते आणि सर्वसाधारण जी कामे पडत त्यांचेही संचालन करते.

**स्थानिकः स्थानिक आध्यात्मिक संस्था**



बहाई समाजाचे स्थानिक पातळीवर मार्गदर्शन निवडून आलेल्या नउ सदस्यांच्या संस्थेद्वारे होते त्याला स्थानिक आध्यात्मिक संसद म्हणून संबोधिले जाते आणि स्थानिक बहाई समाज तिच्या अधिपत्याखाली व मार्ग-दर्शनाखाली कार्य करतो.

**बहाई धर्म आणि संयुक्त राष्ट्र संघः**

संयुक्त राष्ट्र संघाच्या मुख्य कार्यालयात राष्ट्रीय आणि आंतर्राष्ट्र पातळीवर बहाई धर्मास गैर सरकारी संस्था म्हणून प्रतिनिधीत्व करण्य १९४८ पासून मान्यता देण्यात आली आहे. त्यास संयुक्त राष्ट्र संघाच आर्थिक व सामाजिक मंडळावर तथा संयुक्त राष्ट्र संघाच्या बाल कोषावर विचार विनिमय करणारी सस्था म्हणून पदभार सांभाळा लागतो त्याचबरोबर कित्येक बहाई राष्ट्रीय आध्यात्मिक संसदां संयुक्त राष्ट्र संघाच्या माहिती केंद्रामधील अधिकृत यादींमध्ये समावे आहे.

**बहाई धर्माची आंतर्राष्ट्रीय प्रतिष्ठा**

जवळजवळ १५० वर्षांच्याहया अल्प काळात बहाई मित्रांनी आप जागतिक समाज प्रस्थापित केला आहे ज्यांत १८२० हून अधि वेगवेगळया जाती जमातींच्या पार्श्वभूमिचे मित्र असून ते ३६० ह अधिक स्वतंत्र देश, भू प्रदेश आणि बेटे यावर वसलेले आहे खरोखरच मानव वशाच्या सर्व वर्णाचे ते प्रतिनिधीत्व हया जागति